**कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत सन २०२६-२७ करिता तिन्ही प्रवर्गाचा (सर्वसाधारण, अनु.जाती, अनु.जमाती) पहिल्या हप्त्याचा निधी (केंद्र व राज्य हिस्सा) वितरित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४७/४-अे(ई-१६३९२०८)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २१ मे, २०२६

**वाचा:-**

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे, दि.१९/०४/२०१७ .
२. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे, दि.१२/०९/२०१७.
३. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९१९/प्र.क्र.२२१/१४-अे, दि.०४/११/२०२०.
४. शासन पत्र No.CSS-२०२६/C.R.१९/२-A, दि.११/०३/२०२६.
५. केंद्र शासनाचे पत्र F.No.०३/१४/२०२६-KY (E-१८६५५७), दि.२२/०४/२०२६.
६. केंद्र शासनाचे पत्र F.No.(MH-७०३ ), दि.२३/०४/२०२६.
७. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४७/४-अे- (ई-१६३९२०८), दि.११/०५/२०२६.
८. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.०७/०५/२०२६.
९. आदिवासी विकास विभागाचे शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्यासन-६, दि.१३/०५/२०२६.
१०. सामाजिक न्याय विभागाचे शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दि.१९/०५/२०२६.
११. कृषि आयुक्तालयाचे जाक्रकृआ/विप्र-१/राअसुपोअ/नि.वि. २०२६-२७ (भाग-१)/प्र.क्र.०७/र-३२/२०२६. दि.११/०५/२०२६

**प्रस्तावना:**

केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानातून कडधान्य हा घटक वगळून सन २०२५-२६ या वर्षाच्या रब्बी हंगामापासून, कडधान्य घटकासाठी स्वतंत्र “कडधान्य आत्मनिर्भरता अभियान” राबविण्याचे धोरण निश्चित केले होते. त्यानुसार, सदर अभियानाची अंमलबजावणी सन २०२५-२६ पासून केंद्र शासनाच्या दि. १८/१०/२०२५ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात आली आहे. सन २०२६-२७ मध्ये सदर अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत कडधान्य या घटकाखाली, मूलभूत बियाणे खरेदी व पायाभूत बियाणे उत्पादन या बाबी १००% केंद्र हिश्श्याच्या (MH-702) असून, उर्वरित बाबीमध्ये केंद्र व राज्य हिश्श्याचे प्रमाण अनुक्रमे ६०: ४० (MH-703) याप्रमाणे आहे.

कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत सन २०२६-२७ करिता एकूण रु. १६६६७.४५ लाख (केंद्र हिस्सा रु. १००००.४७ लाख व राज्य हिस्सा रु. ६६६७.०० लाख) निधीचा वार्षिक कृती आराखड्यास राज्यस्तरीय मंजूरी समितीने (SLSC), वाचा क्र.४, दि. ११ मार्च, २०२६ अन्वये मान्यता दिली. तसेच, केंद्र शासनाने वाचा क्र.५, दि. २२.०४.२०२६ अन्वये, एकूण रु. १६७७३.२० लाख (प्रलंबित दायित्वासह) वार्षिक कृती आराखड्यास मंजूरी दिली आहे. त्यास अनुसरुन, राज्य शासनाने वाचा क्र.७, दिनांक ११/५/२०२६ च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेच्या वार्षिक कृती आराखडयास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सन २०२६-२७ साठी कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत केंद्र शासनाने वाचा क्र.६, दि.२३/४/२०२६ अन्वये, MH-703 या SLS अंतर्गत तिन्ही प्रवर्गांकरिता (सर्वसाधारण, अनु.जाती, अनु.जमाती) पहिल्या हप्त्यापोटी, केंद्र हिश्श्याचा एकूण रु.४०००.०० लाख निधी वितरीत केलेला आहे. त्याअनुषंगाने, कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत प्राप्त झालेला, केंद्र हिश्श्याचा रु.४०००.०० लाख व त्यास समरुप राज्य हिश्श्याचा रु.२६६६.६६६६७ लाख असा एकूण रु.६६६६.६६६६७ लाख निधीस, वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

सन २०२६-२७ साठी, कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत तिन्ही प्रवर्गांसाठी एकूण रु.६६६६.६६६६७ लाख (अक्षरी रु.सहासष्ट कोटी, सहासष्ट लाख, सहासष्ट हजार,सहाशे सदुसष्ट रुपये फक्त ) (केंद्र हिस्सा रु.४०००.०० लाख व त्यास समरुप राज्य हिस्सा रु. २६६६.६६६६७ लाख) निधीस वित्तीय मान्यता देवून, या शासन निर्णयान्वये, आयुक्त (कृषी) पुणे, यांना सदर निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. सदर निधीपैकी केंद्र व राज्य हिश्श्याच्या वितरीत निधीचे प्रवर्गनिहाय विवरण पुढीलप्रमाणे :-

| प्रवर्ग | केंद्र/राज्य | लेखाशिर्ष | एकुण |
|---|---|---|---|
| **सर्वसाधारण** | केंद्र हिस्सा | २४०१ B७४२ | ३१५२.००००० |
| | समरूप राज्य हिस्सा | २४०१ B७५१ | २१०१.३३३३३ |
| | **एकुण** | -- | **५२५३.३३३३३** |
| **अनु. जाती** | केंद्र हिस्सा | २४०१B७८७ | ४७२.००००० |
| | समरूप राज्य हिस्सा | २४०१B७९६ | ३१४.६६६६७ |
| | **एकुण** | -- | **७८६.६६६६७** |
| **अनु. जमाती** | केंद्र हिस्सा | २४०१B७६९ | ३७६.००००० |
| | समरूप राज्य हिस्सा | २४०१B७७८ | २५०.६६६६७ |
| | **एकुण** | -- | **६२६.६६६६७** |
| **एकुण** | केंद्र हिस्सा | -- | ४०००.००००० |
| | समरूप राज्य हिस्सा | -- | २६६६.६६६६७ |
| | **एकुण** | -- | **६६६६.६६६६७** |

३. सदर अभियानातंर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेला केंद्र व राज्य हिश्श्याचा निधी खालील लेखाशिर्षांतर्गत सन २०२६-२७ करिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून SNA-SPARSH खात्यातून खर्ची टाकावा.

| प्रवर्ग | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा |
|---|---|---|
| **सर्वसाधारण** | मागणी क्र. डी-३,<br>२४०१-पीकसंवर्धन,<br>(००) (१०२) अन्नधान्य पिके,<br>(००) (३९) -कृषी उन्नती योजना- केंद्र पुरस्कृत कडधान्य आत्मनिर्भरता अभियान (केंद्र हिस्सा ६० टक्के)<br>(२४०१ B ७४२) (योजनांतर्गत) (दत्तमत )<br>३३, अर्थसहाय्य | मागणी क्र. डी-३,<br>२४०१-पीकसंवर्धन,<br>(००) (१०२) अन्नधान्य पिके,<br>(००) (४०) कृषी उन्नती योजना- केंद्र पुरस्कृत कडधान्य आत्मनिर्भरता अभियान (राज्य हिस्सा ४० टक्के)<br>(२४०१ B ७५१) (योजनांतर्गत) (दत्तमत )<br>३३, अर्थसहाय्य |

| | | |
|---|---|---|
| **अनुसूचित जाती** | मागणी क्र. एन-०३,<br>२४०१-पीकसंवर्धन,<br>(००) (७८९), अनुसूचित जाती उपयोजना<br>(०० ) (३५)-कृषी उन्नती योजना- केंद्र पुरस्कृत कडधान्य आत्मनिर्भरता अभियान (केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१ B ७८७ )<br>(योजनांतर्गत) (दत्तमत )<br>३३, अर्थसहाय्य | मागणी क्र. एन-०३,<br>२४०१-पीकसंवर्धन,<br>(००) (७८९), अनुसूचित जाती उपयोजना<br>(००) (३६)-कृषी उन्नती योजना- केंद्र पुरस्कृत कडधान्य आत्मनिर्भरता अभियान (राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१ B ७९६ )<br>(योजनांतर्गत) (दत्तमत )<br>३३, अर्थसहाय्य |
| **अनुसूचित जमाती** | मागणी क्र. टी-०५,<br>२४०१-पीकसंवर्धन,<br>(००) (७९६), जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(००) (४७)-कृषी उन्नती योजना- केंद्र पुरस्कृत कडधान्य आत्मनिर्भरता अभियान (केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१ B ७६९ )<br>(योजनांतर्गत) (दत्तमत )<br>३३, अर्थसहाय्य | मागणी क्र. टी-०५,<br>२४०१-पीकसंवर्धन,<br>(००) (७९६), जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(००) (४८)-कृषी उन्नती योजना- केंद्र पुरस्कृत कडधान्य आत्मनिर्भरता अभियान (राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१ B ७७८)<br>(योजनांतर्गत) (दत्तमत )<br>३३, अर्थसहाय्य |

४. सन २०२६-२७ मध्ये राज्यात सदर अभियानाची अमंलबजावणी व सनियंत्रण करण्याच्या दृष्टीने निधी आहरण व वितरण करणेसाठी, पुढीलप्रमाणे नियंत्रण तसेच, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहेत.

| **स्तर** | **नियंत्रण अधिकारी** | **आहरण व संवितरण आधिकारी** |
|---|---|---|
| आयुक्तालय स्तर | आयुक्त (कृषि),<br>कृषी आयुक्तालय, पुणे | सहाय्यक संचालक (लेखा-१) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे. |

५. सदर योजनेची अंमलबजावणी करताना उपरोक्त वाचा क्र.७, दि.११/०५/२०२६ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तींचे पालन करुन निधी वितरणाची कार्यवाही करण्यात यावी.

६. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा तात्काळ विनियोग करण्यात यावा. तसेच, निधी विनियोगाच्या अनुषंगाने संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

७. हा शासन निर्णय, वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.०७/०५/२०२६ आदिवासी विकास विभागाचे शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/ कार्यासन-६,दि.१३/०५/२०२६ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दि.१९/०५/२०२६ नुसार विहीत केलेल्या अटींची पूर्तता होत असल्याने, तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या वेळोवेळी प्राप्त सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५२११९१७०५०२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

RUCHITA RANJAN PIMPLE

Digitally signed by RUCHITA RANJAN PIMPLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=4D2E14E1B5B622285A319D549438716BC45686280AAC03BEA60829E714C19298, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7E83BB07DDF0C67032F513E6336E3EE49F53DC047998C7012096DD9C8059D5FE, cn=RUCHITA RANJAN PIMPLE
Date: 2026.05.21 19:17:47 +05'30'

**( रुचिता पिंपळे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) मा.मंत्री(कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.
११) महालेखाकार ( स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा), मुंबई
१२) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१३) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१४) सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
१५) सर्व कृषी विदयापीठे ( पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ, अकोला, डॉ.बाळासाहेब सांवत कृषि विदयापीठ दापोली, वसंतराव नाईक कृषी विदयापीठ, परभणी व महात्मा फुले कृषी विदयापीठ राहूरी )
१६) सर्व कृषि विज्ञान केंद्रे
१७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२०) सर्व तालुका कृषि अधिकारी.
२१) सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
२२) वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प - १३), मंत्रालय, मुंबई
२३) निवड नस्ती.